## (अनुभव कथन)
## संकटात मदत होई, मिळे मनाधार

***– अनुसयावीरा साटम, सिंगापूर***

-------------------------------------

बाळ जन्माला येण्याची पहिली चाहूल लागली की बाळाच्या आईला किती आनंद होतो हे ती आईच जाणू शकते. परंतु पोटातील बाळ वाढत असतानाच पोटात ट्युमर झाल्याचे ह्या श्रद्धावान स्त्रीच्या चेकअप दरम्यान लक्षात येते आणि मग एकच तारणहार ठरतो – बापू ! आपल्या सद्‌गुरुंवरील प्रचंड विश्वास आणि परमपूज्य सुचितदादांचा सततचा आधार ह्याच्या जोरावर ही आई बाळाला सुखरूप जन्मही देते, आणि स्वत:ची कॅन्सर ट्रीटमेंट पूर्ण होईपर्यंत बाळाला सांभाळूही शकते; फक्त एका सद्‌गुरुकृपेच्या जोरावर.

-------------------------------------

बापूंचे खूपच अनुभव आहेत, सांगावे तितके कमी. त्यातला माझा एक मोठा अनुभव सांगते.

२०१२ साली माझे लग्न झाले. माझे माहेरचे नाव किर्ती कर्ले. २०१३ ला मी सेशल (आफ्रीका) येथे राहण्यास गेले. नोव्हेंबर २०१३ ला मला दिवस गेले. या काळात मला खूपच त्रास होत होता. मी काहीच करू शकत नव्हते. परंतु त्या परक्या देशातही बापूंनी माझी खूप छान व्यवस्था केली होती. नेमके माझ्या नवऱ्याचे बॉस भारतीय होते. ते व त्यांची पत्नी साधारण आमच्याच वयाचे होते. बॉसच्या पत्नींनी ३ महिने माझी खूप काळजी घेतली. दिवसभर मला स्वतःच्या घरी ठेवून, सकाळच्या नाश्त्यापासून रात्रीच्या जेवणापर्यंत त्याच बनवून मला खायला देत असत. अगदी माझी उलटीही त्यांनी साफ केली. नातेवाईक करणार नाहीत इतकी काळजी त्यांनी माझी घेतली. हे सर्व बापूंच्या कृपेने शक्य झाले. तिथे मी सोनोग्राफी, रेग्युलर चेकअप करत होते. सर्व रिपोर्टही नॉर्मल येत.

ह्याच दरम्यान माझ्या बहिणीचे भारतात मे महिन्यात होणारे लग्न त्या दिवसांत कुठलाही हॉल उपलब्ध नसल्याने मार्चमध्ये ठरविण्यात आले. हीसुद्धा बापूंचीच लीला होती असे मला वाटते कारण मी मार्चमध्ये भारतात येईपर्यंत माझ्या उलटीचा त्रास कमी होऊन मी नॉर्मल झाले होते. २७ मार्चला लग्न छान एन्जॉय केलं.

त्यानंतर एप्रिलमध्ये परमपूज्य डॉ. सुचितदादांना त्यांच्या क्लिनिकमध्ये भेटले व त्यांना प्रेग्नन्सीविषयी सांगितले. त्यांच्याच सूचनेवरून डॉ.विक्रम शहांकडे चेकअप केले. सोनोग्राफी, ब्लडटेस्ट सर्व रिपोर्ट नॉर्मल आले. दुसरी सोनोग्राफी मे महिन्यात होती. मधल्या काळात मला पुन्हा उलटीचा त्रास सुरू झाला म्हणून मी डॉक्टरांकडे गेले. तेव्हा त्यांना ती ॲसिडीटी वाटून त्यासंबंधी गोळ्या दिल्या आणि नंतर सोनाग्राफी करायचीच आहे ती आता करून घेऊया, असे ते म्हणाले.

मी २८ एप्रिलला सोनोग्राफी करायला गेले, पण तिथे सोनोग्राफी बरोबर येत नव्हती. तेथील डॉक्टरही घाबरले. कारण त्यांना २० सें.मी. ची गाठ पोटात दिसून आली व पोटात भरपूर पाणीही झाले होते. त्यांनी ताबडतोब रिपोर्ट बनवून माझ्या डॉक्टरांना फोन केला. आम्ही रिपोर्ट घेऊन ताबडतोब डॉक्टरांकडे गेलो. त्यांनी आम्हाला 'गुरुनानक हॉस्पिटल'मध्ये ऑंको सर्जन (कर्करोग तज्ञ) डॉ.फडके यांच्याकडे पाठविले.

डॉ. फडकेंना भेटल्यावर सर्व तपासून ते म्हणाले, ''३ महिन्यांची प्रेग्नन्सी असल्यामुळे एवढ्यात ऑपरेशन करू शकणार नाही. कारण बेबीची वाढ होण्यासाठी ३६ आठवडे तरी झाले पाहिजेत. आपण प्रथम टॅपींग करून पोटातले पाणी काढू'' आणि त्यांनी 'सी–१२५' ब्लड टेस्ट करायला सांगितली.

आम्ही क्लिनिकमध्ये जाऊन दादांना भेटलो. आमचा पूर्ण विश्वास आमच्या देवावर होता. दादांनी, ''आता फक्त 'कोकिलाबेन हॉस्पिटल'मध्ये जाऊन डॉ. शांतला वडियार यांना भेटा आणि ती 'सी–१२५' कॅन्सर टेस्ट करा'' असे सांगितले.

दादांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही टेस्ट केली. तर रिपोर्ट पॉझिटीव्ह आला होता. रिपोर्ट देणाऱ्यांनीसुद्धा ताबडतोब डॉक्टरांना भेटण्याचा सल्ला दिला. रिपोर्ट न उघडता आम्ही आलेला रिपोर्ट गुरुक्षेत्रम्‌मध्ये जाऊन तेथे असलेल्या बापूंच्या चरणमुद्रांवर ठेवला कारण 'सर्व सूत्रे तेथूनच हलणार' ह्याची आम्हाला जाणीव होती.

नंतर रिपोर्ट घेऊन कोकिलाबेन हॉस्पिटलमध्ये डॉ. शांतला वडियार यांना भेटलो. दादांनी आधीच त्यांना कल्पना दिली होती. डॉ. वडियार यांनी स्वतः सोनोग्राफी केली. त्यात त्यांना राईट ओव्हरीजवळ २० से.मी. ची गाठ दिसली. त्यांनी लगेचच त्याच हॉस्पिटलचे कॅन्सर स्पेशालिस्ट डॉ. योगेश कुलकर्णी यांना बोलवून परत सोनोग्राफी करून दाखविली. डॉ. कुलकर्णी यांनी आधी टॅपिंग करून पोटातले पाणी काढण्याचा निर्णय घेतला व नंतर एम.आर.ए. करू म्हणून सांगितले.

पोटातून जवळ जवळ ४ लि. पाणी काढले आणि ते पाणी टेस्टिंगसाठी पाठविले. रिपोर्ट चांगले आले. प्रेग्नन्सी मध्ये एम.आर.ए. करायला कोणीच तयार होत नव्हते. शेवटी त्याच हॉस्पिटलमध्ये एम.आर.ए. केला. टेस्ट करणारेही खूप हैराण होते. खूप उलट सुलट प्रश्न विचारत होते. एम.आर.ए. चा रिपोर्ट येण्याआधीच डॉ. कुलकर्णी यांनी एम.आर.ए. डिपार्टमेंटमध्ये जाऊन एम.आर.ए.ची फिल्म पाहिली आणि त्यांनी ठरविले की 'आता ३६ आठवडे थांबण्यात काहीच अर्थ नाही कारण पोटातला ट्यूमर खूप मोठा आहे व कधीही ब्लास्ट होऊ शकतो.'

मग त्यांनी आम्हाला लगेचच दुसऱ्या दिवशी ६ मेला ॲडमिट व्हायला सांगितले व ७ मेला ऑपरेशन करण्याचा निर्णय घेतला. ट्यूमर इतका मोठा होता की पोट उभे कापूनच काढावा लागणार होता. डॉ. शांतला वडियार दादांना रोज सर्व कळवत असत.

ऑपरेशनच्या आधी मीही दादांना येऊन भेटले. दादा म्हणाले, ''सर्व ठीक होईल. मोठ्या आईवर विश्वास ठेव आणि बिनधास्त रहा.''

७ मे २०१४ रोजी ऑपरेशन करून ट्यूमर आणि राईट ओव्हरी काढली. पोटातल्या बाळाला मोठ्या आईचे संरक्षण कवच होतेच. ऑपरेशनच्या वेळी डॉ. कुलकर्णी आणि डॉ. वडियार यांनी खूप धीर दिला. ''काही घाबरायचे नाही. आपले बापू आहेत ना! बापूंच्या मर्जीशिवाय काही घडणार नाही.''

ट्यूमर टेस्टिंगला पाठवला, तो कॅन्सरचा असल्याचे निष्पन्न झाले व केमो ट्रीटमेंट डिलिव्हरीनंतर २१ दिवस करायला सांगितली. ऑपरेशन झाल्यानंतर तब्येत एकदम नॉर्मल झाली. मस्तपैकी सगळीकडे फिरत होते. ७ व्या दिवशी दादांना क्लिनिकमध्ये भेटले. रेग्युलर चेकअप होत होते. आरामात गुरुक्षेत्रम्‌ला दर्शनाला येत होते.

३६ आठवड्यांनंतर २२ जुलै २०१४ रोजी सिझरींगची तारीख दिली होती. त्यानुसार बाप्पाच्या आशीर्वादाने एका गोड मुलीला जन्म दिला. त्यावेळीही डॉ. योगेश कुलकर्णी आणि डॉ. शांतला वडियार यांनी काही टेस्ट केल्या. दोन्ही ऑपरेशनचे रिपोर्ट दादांना दाखविले. दादांना काय वाटले कोण जाणे, दादा म्हणाले, ''पुढची ट्रीटमेंट चालू करण्याअगोदर डॉ. टोणगांवकरांचा सल्ला घेऊ.'' त्यावेळी डॉ. टोणगावकर भारताबाहेर होते. दादांनी त्यांना सर्व रिपोर्ट ई–मेल केले. ते पाहून डॉ. टोणगांवकरांनी ''घाई न करता स्लाईड टेस्टींगला 'टाटा'मध्ये पाठवूया'' म्हणून सांगितले.

भारतात परतल्यावर त्यांनी रि–टेस्टींगसाठी चिठ्ठी दिली आणि 'कोकिलाबेन'च्या डॉ. कुलकर्णी यांच्याशी बोलले. 'टाटा'चे रिपोर्ट आणि 'कोकीलाबेन'च्या रिपोर्टमध्ये थोडा फरक आल्यामुळे डॉ. टोणगांवकरांनी 'रहेजा'ला पुन्हा टेस्ट करून फायनल ठरवूया, असे सांगितले. रहेजाला केलेल्या टेस्टमध्येही फरक होता. मुख्य म्हणजे 'कोकीलाबेन'मधल्या रिपोर्टप्रमाणे ट्रीटमेंट केली असती तर ती चुकीच्या दिशेने गेली असती.

शेवटी सर्व हॉस्पिटल्सचे रिपोर्ट डॉ.टोणगांवकरांना हिंदुजामध्ये जाऊन दाखवले. या सर्व प्रोसेसला जवळ–जवळ दोन ते अडीच महिने लागले, त्यामुळे मोठ्या आईच्या कृपेने माझ्या बाळाला निदान तितके दिवस तरी अंगावरचे दूध मिळू शकले.

७ ऑक्टोबर पासून माझी केमो ट्रिटमेंट सुरू झाली. एका केमोसाठी ५–७ दिवस हॉस्पिटलमध्ये ॲडमिट रहावे लागत असे व नंतर भयंकर त्रास होई. मग मी दादांच्या क्लिनिकमध्ये डॉ.पडेलकरांना फोन करायचे. त्या दादांना सांगायच्या. दादा निरोप द्यायचे, ''त्रास झाला तरी घाबरू नकोस''; आणि दादांचा निरोप मिळाल्यावर खरोखरच माझा त्रास कमी व्हायचा.

केमोच्या ३ राऊंड डिसेंबरमध्ये संपल्या. डोक्यावरचे पूर्ण केस गेले. त्वचा काळी पडली होती. इतका त्रास फक्त बापूंमुळे सहन करू शकले. माझं बाळही ट्रीटमेंट संपेपर्यंत शांत रहात होतं. गुरुक्षेत्रम्ने खूपच मानसिक आधार दिला. 'आपला सर्व बापूपरिवार माझ्याबरोबर आहे. मी एकटी नाही' हा विश्वास मला मिळाला.

ट्रीटमेंट संपल्यावर लगेचच संस्थेतर्फे नंदाईच्या वार्षिक 'आत्मबल'च्या कोर्सची अनाऊन्समेंट झाली. त्या वर्षीच्या कोर्सची थीम 'आत्मबल फॉर हाऊस वाईफ' होती. अर्थात त्या वर्षीचा कोर्स नंदाईने मुद्दाम नोकरी न करणाऱ्या गृहिणींसाठी ठेवला होता. म्हणजे मला सिलेक्ट व्हायचा चान्स होता. त्याचा फॉर्म भरला व आईने सिलेक्टही केले.

ट्रीटमेंट संपल्यावर दादांना भेटले. दादा खूप खूष झाले. म्हणाले, ''काहीही वाटले तरी मोठ्या आईशी बोलत रहा.''

मी आता एकदम बरी आहे. नंदाईच्या 'आत्मबल' वर्गामुळे मला जगण्याची नवी दिशा आणि प्रेम मिळाले, त्याने माझे आयुष्यच बदलून गेले. आता मी स्ट्राँग झाले आहे. पूर्वी मी खूप घाबरट आणि हळवी होते. पण हा कोर्स केल्यानंतर मी पूर्ण बदलली आहे....अर्थातच अधिक चांगल्या दिशेने! माझ्या बाळाचे नाव मी 'आरोही' ठेवले आहे. आता ती दीड वर्षाची झाली आहे. खूप हुशार आहे. ह्या जगात मोठ्या आईनेच तिला आणले. आता मी जानेवारीपासून सिंगापूरला नवऱ्यासोबत आहे फक्त बापूंमुळेच.

'आमचा बापू हळूहळू आमच्यासाठी सगळं काही नीट करत आहे' ह्या वाक्याची पदोपदी प्रचिती येत राहते. अंबज्ञ, बापू!